नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - ३५५ | Issue - 355 | वार बुधवार दि. १४ मे २०२५ | Blow- Wednesday Date 14 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पाकिस्तानला आम्ही घरात घुसून मारु : पीएम मोदी

## पाकिस्तानकडून आदमपूर एअरबेसवर हल्ला करुन एअरबेस उद्ध्वस्त केल्याचा दावा; मोदी यांचा आदमपूर एअरबेसवरुन पाकिस्तानला इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आदमपूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आदमपूर एअरबेसवर जावून भारतीय जवानांची भेट घेतली.नरेंद्र मोदी यांनी यावेळी भारतीय जवानांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी तीनही सैन्य दलांचं कौतुक केलं. विशेष म्हणजे नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला आम्ही घरात घुसून मारु, असा इशारा दिला. पाकिस्तानकडून आदमपूर एअरबेसवर हल्ला करुन एअरबेस उद्ध्वस्त केल्याचा दावा केला जात होता. पण याच एअरबेसवर जावून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानवर सडकून टीका केली. यावेळी त्यांनी जवानांचं कौतुक केलं.

तुमच्या पराक्रमामुळे आज ऑपरेशन सिंदूरची गुँज प्रत्येक कानाकोपऱ्यात ऐकू जात आहे. या प्रत्येक ऑपरेशन दरम्यान प्रत्येक भारतीय आपल्यासोबत उभा राहिला. प्रत्येक भारतीयाची प्रार्थना आपल्या सगळ्यांसोबत राहिली आहे. आज प्रत्येक देशवासी आपल्या सैनिक आणि त्यांच्या परिवारांप्रती कृतज्ञ आहे. त्यांचा ऋणी आहे, अशी भावना मोदींनी व्यक्त केली.

भारत माता की जय या जयघोषाची ताकद आाताच दुनियाने पाहिली आहे. भारत माता की जय ही फक्त उद्घोषणा नाही. ही देशाच्या प्रत्येक सैनिकाची शपथ आहे, जी भारतमातेच्या मर्यादेसाठी जीवाची बाजी मारतो. हा देशाच्या प्रत्येक त्या नागरिकाचा आवाज आहे जो देशासाठी जगतोय, देशासाठी काहीतरी करु पाहतोय. भारत माता की जय ही घोषणा मैदानातही गुँजते आणि मिशनमध्येही गुँजते. भारताचे सैनिक जेव्हा भारतमातेचा जय म्हणतात तेव्हा शत्रूची छाती फाटते. आपल्या मिसाईल जेव्हा सनसन निशाण्यावर पोहोचते तेव्हा शत्रूला भारत माता की जयचा आवाज ऐकू येतो. आमच्या फौजा जेव्हा अणूबॉम्बच्या धमकीची हवा काढतात तेव्हा आकाशापासून पाताळपर्यंत एकज आवाज गुँजतो तो म्हणजे भारत माता की जय, असं नरेंद्र मोदी म्हणाले.




तुम्ही सर्वांनी प्रत्येक भारतीयाची छाती अभिमानाने उंचावली आहे. तुम्ही प्रत्येक भारतीयाचा माथा गर्वाने उंचावला आहे. तुम्ही इतिहास रचला आहे. मी आज सकाळीच आपल्याकडे आपलं दर्शन घेण्यासाठी आलो आहे. जेव्हा शूरवीरांचे पाय धरतीवर पडते तेव्हा धरती धन्य होते. जेव्हा शूरवीरांचे दर्शन करण्याचं भाग्य मिळतं तेव्हा जीवन धन्य होतं. त्यासाठी मी आज सकाळीच आपल्या दर्शनासाठी इथे पोहोचलो आहे. आजपासून अनेक दशकांनंतरही भारताच्या या पराक्रमाची चर्चा होईल तेव्हा त्याचा सर्वात प्रमुख अध्याय तुम्ही आणि तुमचे सहकारी असतील. आपण सर्व वर्तमानासोबतच देशाच्या येणाऱ्या पिढ्यांसाठी एक नवी प्रेरणा बनले आहात. मी शूरवीरांच्या या धर्तीवरुन आज हवाईदल, नौदल आणि बीएसफ आणि भारतीय सैन्याच्या सर्व शूरवीरांना सॅल्यूट करतो, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

ऑपरेशन सिंदूर ही सामान्य सैन्य अभियान नाही. ही भारताची नीती, नियत आणि निर्णायक क्षमतेची त्रिवेणी आहे. भारत बौद्धांचीदेखील धरती आहे. तसेच गुरु गोबिंद सिंह यांचीदेखील धरती आहे. धर्मासाठी शस्त्र उठवणं ही आमची परंपरा आहे. जेव्हा आमच्या बहीणी, मुलींच्या कपाळावरील कुंकू हिरावलं गेलं तेव्हा आम्ही दहशतवाद्यांना त्यांच्या घरात शिरुन मारलं. ते लपून बसले होते. पण ते विसरले की,त्यांनी ज्यांना ललकारलं आहे ती हिंदची सेना आहे, असं मोदी म्हणाले.


तुम्ही त्यांना समोरुन हल्ला करुन मारलं. तुम्ही दहशतवाद्यांच्या मोठ्या अड्ड्यांना जमीनीत मिटवलं. दहशतवाद्यांची ९ अड्डे उद्ध्वस्त झाली आहे. १०० पेक्षा जास्त दहशतवादी मारले गेले आहेत. दहशतवाद्यांच्या आकांना समजलं आहे, भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याचा एक परिणाम होणार तो म्हणजे विध्वंस. भारताच्या निर्दोष नागरिकांवर हल्ला केला तर त्याचा एकच परिणाम होणार तो म्हणजे विनाश आणि महाविनाश, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला.

## 'काश्मीरच्या मुद्द्यावर कुणाचीही मध्यस्थी चालणार नाही', भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने ठणकावलं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत-पाकिस्तान तणाव निवळल्यानंतर आज पुन्हा एकदा भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने काश्मीरच्या मुद्द्यावर तिसऱ्या व्यक्तीच्या हस्तक्षेपाची गरज नाही, असं म्हटलं. काश्मीरच्या प्रश्नावर भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय चर्चा होईल. पाकिस्तानने भारताच्या जागेवर ताबा केला आहे. पाकिस्तानने भारताची जागा खाली करावी, अशी आमची मागणी आहे. याबाबत गेल्या अनेक काळापासून दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरु आहे. याबाबतच्या चर्चेत तिसऱ्या देशाची आवश्यकता नाही, असं म्हणत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेला ठणकावलं आहे.

आमचा अनेक वर्षांपासून हेच राष्ट्रीय लक्ष्य राहिलेलं आहे की, भारतीय केंद्र शासित प्रदेश जम्मू-काश्मीरशी संबंधित कोणत्याही मुद्द्याला भारत आणि पाकिस्तानला द्विपक्षीय पद्धतीने चर्चा करुन सोडवायचा आहे. या स्थितीत कोणताही बदल झालेला नाही. तुम्हाला माहिती आहे की, हा मुद्दा पाकिस्तानकडून भारताच्या भूभागांवर अवैधपणे कब्जा केल्याचा आहे. पाकिस्तानने भारताची कब्जा केलेली जागा खाली करावी. पाकिस्तानने झजघ खाली करावं. आम्हाया या मुद्द्यांवर कुणाच्याही मध्यस्थीची आवश्यकता नाही, असं परराष्ट्र



मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं. भारताने २२ एप्रिलला पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं. भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ले केले. त्यांचे प्रशिक्षण केंद्र उद्धववस्त केले. पाकिस्तान आधीपासूनच दहशतवाद्यांना खतपाणी घालत आलेला आहे. भारतात २२ एप्रिलला दहशतवादी हल्ला झाला. त्यानंतर भारताने ६ मे ला दहशतवाद्यांच्या प्रशिक्षण केंद्रांना उद्ध्वस्त केलं. आता पाकिस्तानच्या सैन्याने पुन्हा गोळीबार किंवा हल्ला केला तर भारताकडून त्याला चोख प्रत्युत्तर देईल. पण पाकिस्तान शांत राहिला तर भारताकडूनही काहीच प्रतिक्रिया दिली जाणार नाही, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी स्पष्ट केलं. भारत आणि पाकिस्तान दोन्ही देशांच्या डीजीएमओंची चर्चा झाली, असंही परराष्ट्र मंत्रालयाने सांगितलं. दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ या दहशतवादी संघटनेने घेतली होती. त्यामुळे टीआरएफला घातक दहशतवादी संघटनांच्या यादीत टाकावं, अशी आमची मागणी आहे, अशीदेखील भूमिका रणधीर जयस्वाल यांनी मांडली.

## निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन, यंदा पावसाळा लवकर येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : मे महिन्याच्या उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. यावर्षी मान्सून हा एक आठवडा लवकरच महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान विभागानेच याबाबत गुड न्यूज दिली आहे. विशेष म्हणजे दक्षिण बंगालच्या उपसागरातील काही भागामध्ये मान्सून आजच दाखल झाल्याची माहिती आहे. तसेच मान्सून अंदमान निकोबार बेटावरही दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाकडून याबाबत माहिती देण्यात आली आहे.

निकोबार बेटांवर गेल्या दोन दिवसांत मध्यम ते मुसळधार स्वरुपाचा पाऊस पडल्याची माहिती आहे. त्याचबरोबर पुढच्या तीन ते चार दिवसांत मान्सून दक्षिण बंगालच्या उपसागरात आणि अंदमान समुद्रात वाटचाल करणार असल्याचीदेखील महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

नियोजित वेळेच्या किमान एक आठवडाआधी मान्सून दक्षिण बंगालच्या उपसागरात, अंदमान आणि निकोबारच्या बेटावर दाखल झाला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून येत्या काही दिवसात दक्षिण अरबी समुद्र, मालदीव, कुबोरिय परिसर, अंदमान आणि निकोबरसह मध्य बंगालच्या उपसागरात अधिक प्रमाणात विस्तारणार आहे. त्यामुळे तसाच तो हळूहळू केरळ आणि नंतर महाराष्ट्राच्या दिशेला देखील वाटचाल करण्याची शक्यता आहे.

पुणे हवामान विभागाचे तज्ज्ञ के. एस. होसाळीकर यांनीदेखील मान्सूनबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. केरळमध्ये मान्सून त्याच्या नेहमीच्या वेळेपेक्षा लवकर येण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे, असं के. एस. होसाळीकर म्हणाले आहेत. दरम्यान, राज्यात सध्या अवकाळी पावसाने धुमाकूळ घातलेला बघायला मिळाला आहे. के. एस. होसाळीकर यांनी आज महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पुढच्या काही ताासांमध्ये महाराष्ट्रातील जळगाव, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये वादळीवाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यावेळी वाऱ्याचा वेग हा ३० ते ४० किमी प्रतीतास राहण्याची शक्यता आहे. मुंबई हवामान विभागाकडूनही 'एक्स'वर आज पावसाबाबत माहिती देण्यात आली आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलक्या



ते मध्यम स्वरूपाचा पाऊस, ताशी ५०-६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

दक्षिण मध्य महाराष्ट्र जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि ताशी ४०-५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. तर कोकण-गोवा जिल्ह्यातील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि ताशी ३०-४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे, अशी देखील माहिती हवामान विभाहाकडून आज देण्यात आली आहे.

## ट्रम्प यांच्याशी 'ती' चर्चा झालीच नाही! भारतानं अमेरिकेचा दावा स्पष्ट शब्दांत फेटाळला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारत आणि पाकिस्तान यांच्या संघर्षात यशस्वी मध्यस्थी केल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. दोन अण्वस्त्र संपन्न राष्ट्रांमधील युद्ध टाळल्याचा दावा ट्रम्प यांच्याकडून करण्यात आला होता. दोन्ही देशांना व्यापार रोखण्याचा इशारा दिल्यानंतर त्यांनी शस्त्रसंधीची तयारी दर्शवली. व्यापार रोखण्याची धमकी दोन्ही देशांमधील




संघर्ष रोखण्यात महत्त्वाची ठरली, असं ट्रम्प म्हणाले होते. मात्र त्यांचा दावा भारतानं स्पष्टपणे खोडून काढला आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला.

'७ मे रोजी ऑपरेशन सिंदू झाल्यानंतर १० मे रोजी सैनिकी कारवाई थांबेपर्यंत, त्यासाठी सहमती होईपर्यंत, भारत आणि अमेरिकेच्या नेत्यांमध्ये लष्करी परिस्थितीवर बातचीत झाली. त्यांच्यात सातत्यानं संवाद सुरु होता. पण यातील कोणत्याच चर्चेत व्यापाऱ्याचा विषय चर्चिला गेला नाही,' अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संभाव्य अणूयुद्ध रोखल्याचं श्रेय ट्रम्प यांनी घेतलं. तशी माहिती त्यांनी ट्विट करुन दिली. या सगळ्या पार्श्वभूमीवर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं स्पष्टीकरण दिलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाआधी एक भाषण केलं. त्यात त्यांनी भारत-पाकिस्तानबद्दल महत्त्वाचा दावा केला. 'दोन्ही देश शस्त्रसंधीसाठी तयार झाल्यास अमेरिका त्यांना व्यापारात मदत करेल आणि दोन्ही देशांनी शस्त्रसंधीची तयारी न दर्शवल्यास अमेरिका त्यांच्याशी कोणताही व्यापार करणार नाही, अशी भूमिका मी भारत-पाकिस्तानच्या नेतृत्त्वाशी संवाद साधताना घेतली. त्यानंतर दोन्ही देश शस्त्रसंधीसाठी राजी झाले,' असा दावा ट्रम्प यांनी केला होता. तो भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं अगदी स्पष्ट शब्दांमध्ये फेटाळला आहे.

### मान्सून पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निर्देश

### जिल्ह्यातील सर्व गाव व तालुकास्तरीय यंत्रणांनी जिल्हा नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहावे

## मान्सून कालावधीतील संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणा सतर्क असावी


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : मान्सून कालावधीत मोठ्या प्रमाणात किंवा मुसळधार पाऊस झाल्याने पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते तसेच जिल्ह्यातील मध्यम व मोठे पाणी प्रकल्प भरल्यानंतर अतिरिक्त पाणी नदीमध्ये सोडल्यानंतर नदीकाठच्या गावामध्ये पूर परिस्थिती येऊ शकते, त्या अनुषंगाने सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा. तसेच सर्व गाव, तालुका व उपविभागीय स्तरावरील यंत्रणांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मान्सून पूर्वतयारी २०२५ आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, महसूल उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने, सुमित शिंदे अमित माळी, भूजल चे वरिष्ठ भू वैज्ञानिक श्री. शेख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, सर्व तहसीलदार व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की पूर परिस्थिती हाताळण्यासाठी रचनात्मक उपाययोजना म्हणून मोठे व मध्यम तसेच जिल्ह्यातील सर्व प्रकल्पाचे इन्स्पेक्शन करून आवश्यक दुरुस्ती करावी. तसे नैसर्गिक पाणीसाठे, प्रकल्पाचे कालवे व सांडव्याची आवश्यकता दुरुस्ती करून घ्यावी. संभाव्य पूर परिस्थितीच्या अनुषंगाने लोकांमध्ये जनजागृती करावी. एनसीसी, एनएसएस विद्यार्थी आणि स्वयंसेवक, नागरिक यांना प्रथम प्रतिसाद करता दर्जेदार प्रशिक्षण द्यावे. ग्राम सुरक्षा यंत्रणेमार्फत एकाच वेळी मास कॉलिंग द्वारे जिल्ह्यातील १०३९ गावे आणि चार नगरपरिषदा यातील जवळपास १५ लक्ष नागरिकापर्यंत पूर्व सूचना दिल्या जाऊ शकतात, त्या अनुषंगाने पूर्वतयारी करावी असेही त्यांनी सुचित केले.

जिल्हा नियंत्रण कक्षाशी गाव व तालुकास्तरीय यंत्रणांनी संपर्क ठेवावा. त्याप्रमाणेच ग्राम व तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठका मे महिन्यात घ्याव्यात. संभाव्य पूरस्थिती मध्ये जिल्ह्यातील १०५ गावे येतात. या सर्व गावांमध्ये संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने संबंधित तालुकास्तरीय यंत्रणांनी योग्य उपाययोजना करून



ठेवाव्यात. विजेपासून होणारी हानी टाळण्यासाठी नागरिकांनी काय करावे व काय करू नये याबाबत लोकांचे प्रबोधन करावे. जिल्ह्यामध्ये होणाऱ्या सर्व यात्रेचे नियोजन हे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत करावे. सर्व तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीने आपले आराखडे अद्यावत करावे, अशाही सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या.

प्रारंभी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्याधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी मान्सून पूर्वतयारी २०२५ च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कक्षाने केलेल्या तयारीची माहिती पीपीटी द्वारे दिली. तसेच सर्व संबंधित तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कक्षांनी त्यांच्याकडील सर्व आराखडे अद्यावत करून व समितीच्या बैठका त्वरित घ्याव्यात. तसेच प्रत्येक शासकीय विभागाच्या जबाबदारीची माहिती त्यांनी दिली.

## संपादकीय....

### 'काश्मीर'वरून हस्तक्षेप

भारत-पाकिस्तान तणाव निवळल्यानंतर आज पुन्हा एकदा भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने काश्मीरच्या मुद्द्यावर तिसऱ्या व्यक्तीच्या हस्तक्षेपाची गरज नाही, असं म्हटलं. काश्मीरच्या प्रश्नावर भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय चर्चा होईल. पाकिस्तानने भारताच्या जागेवर ताबा केला आहे. पाकिस्तानने भारताची जागा खाली करावी, अशी आमची मागणी आहे. याबाबत गेल्या अनेक काळापासून दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरु आहे. याबाबतच्या चर्चेत तिसऱ्या देशाची आवश्यकता नाही, असं म्हणत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेला ठणकावलं आहे. आमचा अनेक वर्षांपासून हेच राष्ट्रीय लक्ष्य राहिलेलं आहे की, भारतीय केंद्र शासित प्रदेश जम्मू-काश्मीरशी संबंधित कोणत्याही मुद्द्याला भारत आणि पाकिस्तानला द्विपक्षीय पद्धतीने चर्चा करुन सोडवायचा आहे. या स्थितीत कोणताही बदल झालेला नाही. तुम्हाला माहिती आहे की, हा मुद्दा पाकिस्तानकडून भारताच्या भूभागांवर अवैधपणे कब्जा केल्याचा आहे. पाकिस्तानने भारताची कब्जा केलेली जागा खाली करावी. पाकिस्तानने झजघ खाली करावं. आम्हाया या मुद्द्यांवर कुणाच्याही मध्यस्थीची आवश्यकता नाही, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं. भारताने २२ एप्रिलला पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं. भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ले केले. त्यांचे प्रशिक्षण केंद्र उद्ध्ववस्त केले. पाकिस्तान आधीपासूनच दहशतवाद्यांना खतपाणी घालत आलेला आहे. भारतात २२ एप्रिलला दहशतवादी हल्ला झाला. त्यानंतर भारताने ६ मे ला दहशतवाद्यांच्या प्रशिक्षण केंद्रांना उद्ध्वस्त केलं. आता पाकिस्तानच्या सैन्याने पुन्हा गोळीबार किंवा हल्ला केला तर भारताकडून त्याला चोख प्रत्युत्तर देईल. पण पाकिस्तान शांत राहिला तर भारताकडूनही काहीच प्रतिक्रिया दिली जाणार नाही, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी स्पष्ट केलं. भारत आणि पाकिस्तान दोन्ही देशांच्या डीजीएमओंची चर्चा झाली, असंही परराष्ट्र मंत्रालयाने सांगितलं.

## लामजेवाडी येथे १९ मे ला लोकशाही दिन – नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासन सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर : शासनाच्या आदेशानुसार आणि जनतेच्या प्रश्नांना प्रशासनाच्या स्तरावर तातडीने व सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी येत्या १९ मे ( सोमवारी) लामजेवाडी (ता. इंदापूर) येथे तालुकास्तर लोकशाही दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी, अडचणी व विनंत्या ऐकणार असून त्यावर जागेवरच निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे यांनी दिली.

भिगवण– बारामती रस्त्यावरील लामजेवाडी गावील जि. प. शाळेसमोरील हनुमान सभामंडपात सकाळी ११ वाजता हा लोकशाही दिन होणार आहे. सकाळी ते या वेळेत या कार्यक्रमासाठी तालुका स्तरावरील विविध खात्यांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहतील. या कार्यक्रमात उत्पन्न, जात, निवासी, अपंगत्व प्रमाणपत्रासाठी अर्ज, शिधापत्रिका (रेशन कार्ड) संबंधी तक्रारी, पाणीपुरवठा, रस्ते, वीज, आरोग्य व शिक्षणविषयक अडचणी, जमिनीच्या मोजणी, फेरफार, सात–बारा उतारे व इतर महसूल विभागाशी संबंधित तक्रारी, विविध शासकीय योजनांसाठी अर्ज आणि मार्गदर्शन तसेच वृध्द, विधवा व अपंग पेन्शन अर्ज सादर करण्याची संधी नागरिकांना उपलबध्द होणार आहे.

या लोकशाही दिनाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे व आपले प्रश्न व अडचणी मोकळेपणाने मांडाव्यात. सर्व अर्जदारांनी त्यांच्या तक्रारींशी संबंधित आवश्यक कागदपत्रांची प्रत सोबत आणावी, जेणेकरून कार्यवाही सुलभ होईल, असे आवाहन तहसीलदार बनसोडे यांनी केले आहे.

# सुरेश खोब्रागडे यांच्या समग्र कवितेतील आंबेडकरी जाणिवा : आशय आणि अभिव्यक्तीशैली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**प्रस्तावना :**

सुरेश खोब्रागडे हे मराठी साहित्य व आंबेडकरी साहित्य क्षेत्रातील कवी आहेत. यांचे नाव हे सबंध विदर्भासह महाराष्ट्रातील अनेक ओठांवर घेतले जात आहे. ते साहित्य, कला, नाटक, सामाजिक, सांस्कृतिक व वक्तृत्व आदीमध्ये प्रमुख भूमिकेने हे नाव घेतले जात आहे. आंबेडकरी साहित्य क्षेत्राच्या परिघातील महत्त्वाचे कार्य सुरेश खोब्रागडे करत आहेत. आंबेडकरी साहित्यिक, कवी व समीक्षक अशा स्वरूपाचे त्यांचे व्यक्तिमत्त्व फूलत आणि बहरत आहे.

सुरेश खोब्रागडे यांनी आंबेडकरी जाणिवेच्या कवितेसोबतच नाटक, समीक्षा व वैचारिक लेखनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रबोधनाचा वारसा पुढे नेण्याचा दर्जेदार प्रयत्न केला आहे. त्यांची 'दीक्षाभूमी एक चिंतन काव्य' (दीर्घकाव्य, १९९६) 'मोर्चा' (२६ जानेवारी २०११), आणि 'वेळेवर येणारे इतर विषय' (६ डिसेंबर २०१७) 'समय पर आने वाले अन्य विषय' (अनुवाद २०२३) असे तीन कवितासंग्रह त्यांचे प्रकाशित असून तीनही कवितासंग्रहात आंबेडकरी समाजातील आंबेडकरी जाणिवांचा आढावाच मांडलेला आहे. त्यामुळे सुरेश खोब्रागडे हे शास्त्रशुद्ध आंबेडकरी कवी प्रामुख्याने आहेत हे दिसून येतात. त्यांची कविता ही समाजाची दयणीय अवस्था उचलून धरणारी वाटते. त्यांच्या कविता प्रवासात तसे अनेक दाखले कवितेच्या रुपाने संग्रहात नोंदविले आहेत. समाजाचे प्रश्न, समाजाचे चित्र प्रामुख्याने कवितेत उपयोगी आणले आहे. कवीने आपल्या कवितेत आंबेडकरी चिंतन व्यक्त केले असून चिंतनातून मार्ग काढायचे माध्यम कविताच ठरताना दिसते.

**अभिव्यक्तीतील आंबेडकरी जाणिवा :**

कवितेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मूल्यविचार जनमाणसात रुजविण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आणि मूल्यविचार पेरण्याचा प्रयत्न कवितेतून केलेला आहे. याशिवाय 'आंबेडकरी कविता:आस्वाद आणि मीमांसा' (समीक्षा), 'मराठी कविता: आकलन आणि चिंतन' (समीक्षा), आंबेडकरी चळवळीला वाहिलेल्या 'अक्षरवाहिनी' या अनियतकालीकाचे ०८ अंक त्यांनी प्रकाशित केले आहे. सुरेश खोब्रागडे यांच्या एकूणच वाङ्मयावर, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व त्यांच्या जाणिवांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. त्यांच्या कवितेतील आंबेडकरी जाणिवांचा शोध घेऊन समाजाला प्रबोधनाचा वसा प्राप्त करुन देणे हे महत्त्वाचे कार्य आहे,१ असे डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी 'आंबेडकरी कविता आस्वाद आणि मीमांसा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आंबेडकरी जाणिवांविषयी म्हणतात.

**अभिव्यक्ती समजून घेतांना :**

कवी सुरेश खोब्रागडे यांच्या तीनही कविता संग्रहातील कवितांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधन स्वरूपी प्रतिनिधित्व करताना अभ्यासता आले. कवी स्वतःला अभिव्यक्त करण्यासाठी कविता हातात घेऊन जगण्याचे सामर्थ्य उभे करताना दिसतात. जीवनात आंबेडकरी जाणिवाची कविताच त्यांनी जगली आहे. आजही याच भूमिकेवर ठाम आहेत. सुरेश खोब्रागडे यांची कविता मुक्तछंदातील असून प्रबोधन करण्यासारखे वक्तव्य करणारी आहे. हाच कवींच्या कवितेतील सुरेखपणा, निर्मळ, प्रांजळ पाण्यासारखा वाहताना दिसत आहे. सुरेश खोब्रागडे यांच्या आंबेडकरी जाणिवा व आशय हे समाजाचे वास्तव संदर्भ सांगणारा वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार व प्रेरणा देणारा आहे. म्हणून हे केवळ आंबेडकरी कविताच प्राणांकित आहे असे म्हणायला हरकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अनेक कविता, तसेच उत्कृष्ठ काव्यसंग्रहही प्रकाशित झाले आहेत. पण पवित्र अशी ऊर्जा देणाऱ्या दीक्षाभूमीवर महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात असा मोठा हा पहिलाच दीर्घकाव्यसंग्रह पाहायला मिळाला आहे. सुरेश खोब्रागडे यांनी दीक्षाभूमीचे महत्व, तिचे अस्तित्व सांगून ती दगड, सिमेंटची, लोहा व अन्य साधनांच्या आधाराने तयार झालेली इमारत नाही. तर सम्यक क्रांतीचे उद्गाते तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रज्ञा, शील, करुणा असा संदेश देणारी प्रेरकभूमी आहे, असे सुरेश खोब्रागडे यांनी प्रत्ययकारीरीतीने व्यक्त केले आहे. ती एखादे उर्जावन इमारत वाटावी असे त्या पवित्रभूचे महासंगर कवी यांनी या कवितासंग्रहातून विस्तृत रचले आहे. ही कविता समतावादी विचार पेरणाऱ्या माणसांना उर्जा देणारी, स्फूर्ती देणारी आहे. दीक्षाभूमीचे दर्शन घडले की, आंबेडकरवादी समाज मनातील सर्व वाईट विचार हे आपोआपच नाहीसे होताना अनेकांचा अनुभव व्यक्त झाल्याचे कवी म्हणतात.

दीक्षाभूमी,
तू लक्तरलेल्या आयुष्यावर
पांघरूण घालणार आभाळ आहेस,
बाबासाहेबांच्या स्वप्नाचा एक
नेत्रदीपक आविष्कार आहेस ! २

कवी दीक्षाभूमीला सांगताना म्हणतात, तू आमच्या प्रत्येक सुखाची लागणारी चाहूल आहे. आम्हाला क्रांती करायला लावणारे नवे ऊर्जावान पाऊल आहे. तू आमच्या उद्धारासाठी अनेक प्रस्थापितांचा बाजार फेकून लावलास. आम्हाला लागलेला रूढी परंपरेचा आजार हा प्रज्ञा, शील, करुणा यांनी आम्हाला दुरुस्त करून जगण्याची जिवंत ज्योत लावली. विषमतावादी जहर पचवून ऐतिहासिक क्षण घडवलास. मनुवादी वर्णभेद हे दूर सारून आमच्या जीवासाठी, आंबेडकरवादी समाजासाठी कोणतेही रक्त न सांडवता अलौकिक क्रांती केली आहे. हे विसरता येत नाही. ते आपल्या 'आंदोलन' कवितेत म्हणतात.

एका महावृक्षाच्या स्वप्नाला
रक्तबंबाळ करून
स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वासाठी
(?)
फांद्या तुटून जागोजागी पडल्यात
कुणी प्रस्थापितांच्या गटारात,
अंधातरीच लोंबकळत
राहिल्यात...३

सुरेश खोब्रागडे यांनी मोठे विलक्षण लेखन या कवितेमध्ये केले आहे. ते म्हणतात, महावृक्षाचे स्वप्न रक्तबंबाळ केले. स्वतःच्या अस्तित्वासाठी, स्वार्थासाठी, फांद्या तुटून पडल्या, प्रस्थापितांच्या गटारात वास करतात. तर कुणी बेशरमसारखे चिकटून लोंबकळत राहतात. आपल्या लोकांचे रक्त पिऊन शोषण करतात. तर काही मानवी फांद्यानी निर्लज्ज होऊन आपापली दुकानदारी थाटली गटागटात विभागले. हे सर्व बंद पडायला मला तयार व्हावे लागेल, 'रमाई'चे जीवन मांडताना ते आपल्या एका कवितेत म्हणतात.

रमाई, तू महासूर्याची सावली,
कित्येक दुबळ्यांची तू माऊली.
तू म्हणजे एक स्वतंत्र अस्तित्व,
तू युगंधरांच वेगळ विश्व.४

सुरेश खोब्रागडे त्यागाची मूर्ती, वादळाची सावली, कष्टाळू माऊली मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या कर्तृत्वाची दखल घेताना अतिशय मार्मिक कविता लिहिली आहे. प्रज्ञासूर्याची सावली रमाई ही अनेक जीवांची माऊली होऊन गेली आहे. रमाईच्या कष्टाने बाबासाहेब हे उच्चविद्याविभूषित झाले आणि अनेक महान कार्यसुद्धा केले. बाबासाहेबांसाठी रमाई एक विश्व होत्या. अनेक कठीण काळी रमाईने बाबासाहेबांना साथ दिली आणि हिम्मत दिली. म्हणूनच सामाजिक लढे यशस्वी केले आहे. प्रेम, करुणा, दया या सर्वांनी रमाई कारुण्याच्या महासागरच होत्या. रामू ही नालंदा तक्षशीलासारख्या अनेक विद्यापीठाचे नवे विचारपीठ होती. रमाईने जगाची माता होऊन जगाला प्रेम दिले आणि आकाशाला बहरविणारी रमाई कविताच होती. असे रमाईचे जीवन कवीने आपल्या विचारातून उत्तम रेखाटले आहे.

हे युगनायका !,
तू आम्हाला तुझी वाचा दिलीस,
डोळे दिलेस, दृष्टी दिलीस,
आमच्या संपूर्ण निराकार शरीरालाच
आकार दिलास,
तू आणि अपूर्व सौंदर्यसंपन्न करुन
टाकलंस तू,५

आमचे सारे जीवन हे जे काही मिळाले आहे, ते जपण्याची आणि येणाऱ्या पिढीला वारसा हक्काने प्रदान करण्यासाठी, ते अधिक समृद्ध, सकस आणि तेवढेच तेजस्वी करण्याची गरज आहे. हत्तीच्या प्रत्येक अवयवांमध्ये, आंधळ्यांना दिसणारे हत्तीचे समग्र रुप, केवळ त्यांच्या आनंदामध्येच परिवर्तित होते. कारण हत्ती आणि त्यांच्यामध्ये असणाऱ्या भिन्नत्वाचा तो परिणाम असतो. ज्याने हे जीवनच नव्याने उभारले आणि अंथरले, ते बाबासाहेबांच्या पुतळ्यांमुळे तडा जाऊ शकत नाही. याउलट मोहल्ल्यांमध्ये पुतळ्यांमुळे निर्माण होणारी आंबेडकरी ऊर्जा आणि प्रेरणेचा स्त्रोत अधिक गतिशील होत असतो. हे सर्व तत्वज्ञान आणि विचारधारा कवीच्या कवितेमध्ये दिसून येत आहे. वरील कवितेवर प्रा. सत्येश्वर मोरे, हे 'वेळेवर येणारे इतर विषय' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत असे म्हणतात. की, युगनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचा, दृष्टी, डोळे, सौन्दर्यसंपन्न शरीर, सारे काही दिले आहे, याचा उपयोग आपण कसे करतो यावर अवलंबून आहे. माणसाचे जन्म हे निसर्ग: होते पण जीवन मात्र डॉ. आंबेडकरांनीच दिले आहे,६ असे वरील ओळीचे विवेचन करताना प्रा. मोरे म्हणतात.

हे मूलनिवासी भूमिपुत्र, तुम्हारे पत्नी का शव १२ किलोमीटर तक
अकला ही कंधोपर वहन कर, पलभरमे ओडिसा को व निरंतर सहिष्णुता की
तारिफ करनेवाले अपने देश को दुनिया के सामने लाना किंवा कठिन होता है दाना दाना मांझी या कवितेमध्ये कवी त्या मांझी नावाच्या पात्राचे, त्याच्या भावनांचे चित्र कवितेतून बोलके करतात. मांझीची धडपड या कवितेत म्हणतात. समाजात रोज डोळ्यापुढे घडणाऱ्या घटना, समाजातील बदलणारे चित्र यांनी मन हेलावून जाते. विकसनशील देशात आजही समस्यांचा पाढा वाचल्याशिवाय दिवस निघत नाही. अशाप्रकारे समाजाचे मूल्यमापन करणारी ही कविता आहे असे दिनेश कोटांगले म्हणतात.७

**निष्कर्ष :**

१) सुरेश खोब्रागडे यांच्या कवितेमध्ये प्रखर आंबेडकरी जाणिवा दिसतात.

२) सुरेश खोब्रागडे यांनी कवितेमध्ये सामाजिक चिंतन मांडून न्याय देण्याचे काम केले.

३) सुरेश खोब्रागडे यांची समग्र कविता ही विचार मूल्य रुजविणारी अशी आहे.

४) कवितेमध्ये बुद्ध विचारांचा प्रसार व प्रचाराची जबाबदारी पाहावयास मिळते.

५) आंबेडकरी जाणिवा व बुद्ध विचाराने कविता ही समाजाचे प्रतिबिंब ठरते.

६) यांच्या कवितेतील प्रतिमा, प्रतीके व उपमा फारच वैचारिक संदेश देतात.

७) सुरेश खोब्रागडे यांनी कवितेला उच्चत्तम दर्जा प्राप्त करून दिला.

८) त्यांच्या कवितेत संवादात्मकता आणि कथात्मकता दिसते

९) नाट्यमयता ही त्यांच्या कवितेमध्ये पाहावयास मिळते

१०) उपरोध आणि उपहासाची सूत्रबद्ध मांडणी त्यांच्या कवितेत दिसून येते

**समारोप :**

कवी सुरेश खोब्रागडे यांनी कवितेला नवे वेगळे रूप दिले आहे. कवीच्या कवितेतील आंबेडकरी जाणिवा त्यांच्या अभिव्यक्तीमधून फार प्रकटपणे जाणवतात. त्यांनी ज्या जाणिवा कवितेत मांडलेल्या त्या वास्तव असून रोजच्या घडणाऱ्या घटनातून प्रश्न उभे केले आहे. सामाजिक दशा व दिशा यांनी मानव मोठा चिंतनीय झाल्याचे दिसते. अशा आशयाच्या कविता या मानवमुक्तीला आधार देणाऱ्या वाटतात. यामुळे समाज सुधारणा घडवू शकते. असा विचार त्यांनी कवितेत मांडला आहे. नव्वदोत्तरी आंबेडकरी कवितेत आपल्या अनोख्या शैलीने त्यांनी स्वतःचे स्थान सिद्ध केले आहे.

संदर्भ टिपा :

१) डॉ. शैलेंद्र लेंडे यांची प्रस्तावना, 'आंबेडकरी कविता : आस्वाद आणि मिमांसा', प्रबुध्दभारत पुस्तकालय, प्रकाशन व्यवसाय, कमाल चौक, नागपूर, १४/१०/२०२०, पृ.१०

२) सुरेश खोब्रागडे, 'दीक्षाभूमी : एक चिंतनकाव्य', मध्यमा प्रकाशन, नागपूर. १९९६ पृ.९

३)) सुरेश खोब्रागडे, 'मोर्चा', मध्यमा प्रकाशन नागपूर, २६ जानेवारी २०११, पृ. १४,

४) सुरेश खोब्रागडे, 'मोर्चा', मध्यमा प्रकाशन नागपूर, २६ जानेवारी २०११, पृ. ४७.

५) सुरेश खोब्रागडे, 'वेळेवर येणारे इतर विषय', प्रबुध्दभारत पुस्तकालय, प्रकाशन व्यवसाय, कमाल चौक, नागपूर–१७, ६ डिसेंबर २०१७, पृ. ३६

६) प्रा. सत्येश्वर मोरे यांची प्रस्तावना, 'वेळेवर येणारे इतर विषय' प्रबुध्दभारत, पुस्तकालय, प्रकाशन व्यवसाय, कमाल चौक, नागपूर–१७, ६ डिसेंबर २०१७, पृ. २०

७) दिनेश कोटांगले यांची समीक्षा, (डॉ. युवराज सोनटक्के, 'समय पर आने वाले अन्य विषय' अनुवाद २०२३) समीक्षा पब्लिकेशन पंढरपूर.

**– मुन्नाभाई रेवचंद नंदागवळी**
**(संशोधक विद्यार्थी)**
**गोविंदराव वारजूकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभीड, जि. चंद्रपूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
**भ्रमणध्वनी : ९७६४६७६४९९**
**संकेतस्थळ:** munnabhai.swarkavya@gmail.com
**– प्रा. डॉ. अनमोल शेंडे**
**(संशोधक मार्गदर्शक)**
**गोविंदराव वारजूकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभीड, जि. चंद्रपूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
**संकेतस्थळ:** shendeanmolgmail.com

# कृत्रिम बुद्धिमत्तेतून हरित कृषी क्रांतीची नवी पहाट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जगभरात आधुनिक तंत्रज्ञानामुळे सर्वच क्षेत्रात स्थित्यंतरे होत असताना शेतीदेखील याला अपवाद ठरू शकत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स – एआय), ड्रोन तंत्रज्ञान, रिमोट सेन्सिंग आदींसह नवकल्पनांना प्रत्यक्ष रूप देत अनेक 'स्टार्टअप' या क्षेत्राच्या विकासासाठी उदयास येत आहेत. या तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना आणि शेतीला निश्चितच फायदा होणार आहे.

अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ जॉन मॅकार्थी यांनी १९५५ मध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धीमत्ता) ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. बुद्धिमान यंत्रे बनविण्यासाठी विज्ञान– तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीचा वापर अशी या तंत्रज्ञानाची व्याख्या त्यांनी केली होती. अर्थात माणसाप्रमाणे कार्यान्वित होणारी बुद्धिमत्ता संगणकीय प्रणालीद्वारे तयार करुन अपेक्षित कार्य साध्य केले जाते. त्याला बुद्धिमत्ता म्हणून विचारात घेतले जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता रिमोट सेन्सिंग, ब्लॉक चेन, जीआयएस तंत्रज्ञान, रोबोटिक्स, ड्रोन, आदीतुन शेतकऱ्यांसाठी अचूक हवामान अंदाज, माती आणि पीक आरोग्याचे विश्लेषण आणि भविष्यसूचक विश्लेषणातून अचूक शेती आदी बाबींतून कृषी परिसंस्थेचे स्वरुप बदलते आहे.

भारत जगात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीत १४ व्या क्रमांकावर आहे. जागतिक नवप्रवर्तक देशाच्या निर्देशांकामध्ये १३२ देशाच्या यादीत आपल्या देशाचा ५० वा क्रमांक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता शेतीतील बहुतांश आव्हाने कमी करू शकते. एकंदरीतच डिजिटल पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाविषयी जागरुकता यासह प्रशिक्षणाला चालना यावर अधिक भर देऊन पुरेशा गुंतवणुकीतून सदाहरित कृषी क्रांतीची पहाट निश्चित होईल.

शेतीसाठीच्या पाण्याचे काटेकोर व्यवस्थापन, पीकबदल, पोषण व्यवस्थापन, काढणी व काढणीपश्चात नियोजन आणि बाजारपेठेचे विश्लेषण आदींबाबत डिजिटल तंत्रज्ञान शेतकऱ्यांना शेती अधिक स्मार्ट, कार्यक्षम आणि शाश्वत करण्यास निश्चितपणे मदतीचे ठरणारे आहे.

हरितक्रांतीतून देशाने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त केली असली तरी, कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका या शेती तंत्रांच्या पलिकडे विस्तारत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता कृषी संसाधनांच्या पर्याप्त वापराबरोबरच पर्यावरणीय स्थितीचे आरोग्य देखील सुस्थितीत राखण्यास साहाय्यक ठरु शकते. जगभरातील वाढत्या लोकसंख्येसोबतच वाढती अन्न उत्पादनाची मागणी विचारात घेता पारंपरिक शेती पद्धतीच्या पलिकडे ए.आय. सारख्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानातून कृषी परिसंस्थेमध्ये बदल होत आहेत.

हवामान बदल, लोकसंख्येची वाढ आणि संसाधनांची कमतरता यासारख्या जागतिक आव्हानांमुळे नवकल्पनांसह नवनवी कृषीतंत्रे अधिकाधिक आवश्यक होत आहेत. याचा पिकांवरील रोग ओळखणे, स्वयंचलित तण नियंत्रण प्रणाली, पशुधन आरोग्य निरीक्षण, पीक उत्पन्नासाठी अंदाजात्मक विश्लेषण, अचूक सिंचन प्रणाली, ड्रोनच्या साहाय्याने हवाई पाळत ठेवणे, पुरवठा साखळी सक्षमतेसह आणि मागणी अंदाज आदी बाबींतून शेती पद्धतींमध्ये क्रांती घडत आहे.

भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने ग्रिस्टॅक तयार करण्याची योजना आखली आहे. डिजिटल कृषी मिशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉक चेन, रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस तंत्रज्ञान, ड्रोन आणि रोबोट्सचा वापर आदी नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पासाठी सरकारने सार्वजनिक आणि खाजगी सहभागातून २०२१–२०२५ साठी ही सुरुवात केली आहे.

हरितक्रांतीतून देशाने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त केली असली तरी, कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका या शेती तंत्रांच्या पलिकडे विस्तारित आहे. सन २०२३ मध्ये कृषी बाजारातील जागतिक कृत्रिम बुद्धिमत्तेचे मूल्य १.८२ अब्ज डॉलर होते, ते २०२४ पर्यंत १२.४७ अब्ज डॉलर वाढण्याचा अंदाज आहे. भारताचे २०२४ मधील कृत्रिम बुद्धिमत्तेचे बाजारमूल्य ५५.१७ दशलक्ष डॉलर असल्याचे दिसते. संसाधनांचे संरक्षण आणि हवामान बदल कमी करणे, शेतीला भविष्यासाठी अधिक अनुकूल आणि लवचिक बनवणे यासारख्या हे नव तंत्रज्ञान सध्याची शेती व्यवस्थेत आमूलाग्र बदलाच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका निश्चितपणे निभावेल.

या डिजिटल तंत्रज्ञानामुळे शेतीसाठी द्यावा लागणारा वेळ, पैसा, पाण्याची आणि खतांची बचत होईल, तसेच मनुष्यबळ कमी लागेल. शेतीबाजारपेठेचे विश्लेषण करून, पीक उत्पादनाचा अंदाज लावून योग्य किंमत धोरण निश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरेल. ज्यामुळे शेतकऱ्यांना माहितीपूर्ण व्यवसाय निर्णय घेण्यास मदत होईल. आज कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठांशी जोडण्यासाठी आणि ग्राहकांना त्यांची उत्पादने थेट विकण्यासाठी नवीन संधी उपलब्ध होतील. याशिवाय कृषी पर्यटनासारख्या मूल्यवर्धित सेवांच्या विकासामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नव–नव्या संधी निर्माण होतील यात शंका नाही.

**– संकलन : विभागीय माहिती कार्यालय, पुणे (संदर्भ: मासिक कृषी पणन मित्र, माहे मे २०२५)**
**उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**नवीन मध्यवर्ती इमारत,**
**तळमजला, ससून रुग्णालयासमोर,**
**पुणे–४११ ००१**
**दूरध्वनी: ०२०/२६१२३४३५**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### महामंडळ उपकेंद्र् येथे पंढरपूर मंगळवेढा सांगोला माळशिरस तालुक्यातील लाभार्थींचा जनता दरबार

पंढरपूर/प्रतिनिधी : मराठा समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासव सुशिक्षित बेरोजगार तरुणांना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य करत आहे.

त्याच अनुषंगाने मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना महामंडळाच्या व बँकेकडून येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी जनता दरबार आयोजित केला आहे तरी गुरुवारी दिनांक १५ मे २०२५ रोजी सकाळी दहा ते दुपारी तीन पर्यंत स्थळ अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागास महामंडळ उपकेंद्र कार्यालय गाळा नंबर सात इंदिरा गांधी चौक शॉपिंग सेंटर पहिला मजला पंढरपूर जिल्हा सोलापूर येथे अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष मा ना श्री नरेंद्र अण्णासाहेब पाटील( मंत्री दर्जा) हे उपस्थित राहणार आहेत.

पंढरपूर मंगळवेढा सांगोला व माळशिरस तालुक्यातील ज्या लाभार्थ्यांना महामंडळाच्या योजने संदर्भात येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करून घेण्याकरिता या ठिकाणी तमाम मराठा बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान महामंडळाचे अध्यक्ष ना श्री नरेंद्र पाटील यांनी केले आहे.

### पाणी टंचाई आढावा बैठक : सद्यस्थितीत ६ तालुक्यातील २६ गावांना ३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू

# जिल्ह्यातील नागरिकांना पाणीटंचाई भासणार नाही याची दक्षता घ्यावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

### टँकर मागणी प्रस्ताव आल्यास तात्काळ संयुक्त स्थळ पाहणी करून निर्णय घ्यावा, पाणीटंचाई निवारणार्थ सर्वांनी सतर्क रहावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यात सद्यस्थितीत ६ तालुक्यातील २६ गावांना ३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. जिल्ह्याच्या अन्य ठिकाणाहून टँकर मागणीचे प्रस्ताव आल्यास त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी संयुक्त स्थळ पाहणी करावी व विहित नियमावलीप्रमाणे तात्काळ निर्णय घ्यावा.

तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी टंचाई पाणीटंचाई निवारणार्थ अत्यंत सतर्क राहून काम करावे व एक ही नागरिक पाण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित पाणीटंचाई आढावा बैठकीत



जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, महसूल उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, भूजल चे वरिष्ठ भू वैज्ञानिक श्री. शेख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**सर्व उपविभागीय अधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्याकडून लघु व मध्यम पाणी प्रकल्पामधील पाणीसाठ्याची माहिती घ्यावी व हा पाणीसाठा किती दिवस पुरेल त्याची सूक्ष्म माहिती घेऊन त्याप्रमाणे काटेकोरपणे नियोजन करावे. सर्व उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जिल्हा परिषद यांनी नळ योजनेची विशेष दुरूस्ती ची सर्व कामे त्वरित मार्गी लावावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या.**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पुढे म्हणाले की, टंचाई आराखड्यात प्रस्तावित केल्याप्रमाणे विहीर व विंधन विहीर अधिग्रहण करण्यात यावे. तसेच सद्यस्थितीमध्ये २६ गावांमध्ये सुरू असलेले ३२ टँकर तर सुरूच ठेवावेत परंतु अन्य ठिकाणाहून नागरिकांनी टँकर मागणीचे प्रस्ताव दिले असतील तर संबंधित अधिकाऱ्यांनी संयुक्त स्थळ पाहणी करून त्यावर तात्काळ निर्णय घ्यावा. सर्व उपविभागीय अधिकारी तसेच तालुकास्तरीय यंत्रणांनी एकही गाव, नागरिक यांना पाण्याची टंचाई भासणार नाही यासाठी अत्यंत सतर्कता ठेवून काम करावे असे निर्देश त्यांनी दिले.

महसूल उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांनी टंचाई कृती आराखड्याप्रमाणे टंचाई निवारणार्थ घेण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती बैठकीत दिली.

# हॉटेल वैष्णवी तसेच हॉटेल पंचामृत या हॉटेल चालकांकडून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची लूट; प्रवाशांची आर्थिक लूट होण्यासाठी खाजगी ट्रॅव्हल्सचे चालक वाहक देखील तितकेच जबाबदार !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई,(केतन भोज);कोकणात जाणारे चाकरमानी प्रवासी खाजगी ट्रॅव्हल्स मधून प्रवास करत असताना रात्रीच्या जेवणासाठी खाजगी ट्रॅव्हल्सचे वाहक चालक मुंबई गोवा महामार्गावरील पनवेल येथील हॉटेल वैष्णवी तसेच कोकणातून पुन्हा मुंबईसाठी परतीचा प्रवास करत असताना चिपळूणच्या जवळच असलेल्या हॉटेल पंचामृत याठिकाणी प्रवाशांच्या जेवणासाठी गाडी थांबवतात.तसेच शिमगा व गौरी गणपतीसाठी कोकणात जाताना याशिवाय आता मे महिन्याच्या मुलांच्या सुट्टीच्या दिवसात मुंबई गोवा महामार्गावरील या दोन्ही हॉटेल ला खाजगी ट्रॅव्हल्सवाले याठिकाणी जेवणासाठी गाडी थांबवत असल्यामुळे प्रवाशांची या हॉटेल ला प्रचंड गर्दी होते. त्यामुळे कोकणात जाताना तसेच

### शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाची डोळे झाक




कोकणातून मुंबईत येताना देखील सामान्यांच्या खिशाला याठिकाणी कात्री लागताना दिसत आहे. हे हॉटेल चालक प्रवाशांच्या मजबुरीचा चांगलाच फायदा घेत असून, याठिकाणी सर्वसामान्य प्रवाशांची अक्षरशः लूट सुरु आहे.सर्वच अन्न पदार्थ चढया भावाने विकले जात आहेत.

साधी पाणी बॉटल तसेच अन्य वस्तू देखील याठिकाणी छापील किंमती पेक्षा दुप्पट किंमतीने प्रवाशांना विकले जात आहेत, हॉटेल वैष्णवी तसेच हॉटेल पंचामृत या दोन्ही हॉटेल मध्ये अन्न पदार्थ देखील एकदम निष्कृट दर्जाचे बनवले जात असून, लांबचा प्रवास असल्याकारणाने व मजबुरीमुळे प्रवाशांना ते घ्यावे लागत आहेत.आणि या हॉटेलच्या ठिकाणी सर्वात गलिच्छ प्रकार म्हणजे अतिशय घाणेरडे किचन तसेच टॉयलेट ची देखील अत्यंत दुरवस्था येथे आहे.

खाजगी सर्वच ट्रॅव्हल्सवाले यांना हे सर्व माहित असूनही देखील आपल्याला मोफत जेवायला मिळत असल्यामुळे तसेच आपली गाडी ही हॉटेलला जेवणासाठी लावत असल्यामुळे खाजगी ट्रॅव्हल्सच्या वाहक चालकाला




हॉटेल चालका कडून टिप भेटत असल्यामुळे ते याठिकाणी आपल्या गाड्या थांबवतात. त्यांना प्रवाशांच्या आरोग्याची याठिकाणी कोणत्याही प्रकारची पर्वा असलेली दिसत नाही.या हॉटेल चालकांबरोबर हे खाजगी ट्रॅव्हल्सवाले प्रवाशांच्या आरोग्याशी खेळत आहेत. त्यामुळे हॉटेल वैष्णवी तसेच हॉटेल पंचामृत या दोन्ही हॉटेल चालकांकडून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची लूट केली जात असून प्रवाशांची आर्थिक लूट होण्यासाठी खाजगी ट्रॅव्हल्सचे चालक वाहक देखील तितकेच जबाबदार याठिकाणी दिसत आहेत, तरी संबंधित प्रशासन तसेच महाराष्ट्र शासनाचे अन्न व औषध प्रशासन विभाग याठिकाणी हेतुपुरस्सर डोळे झाक करत आहे का?असा प्रश्न याठिकाणी निर्माण होत आहे तसेच अन्न व औषध प्रशासनाने तत्काळ मुंबई गोवा महामार्गावरील पनवेल येथील हॉटेल वैष्णवी तसेच चिपळूण जवळील हॉटेल पंचामृत मध्ये बनवल्या जाणाऱ्या सर्वच अन्न पदार्थांची तपासून करून यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी आणि या दोन्ही हॉटेलचे लायसन्स रद्द करावेत अशी सर्व प्रवासी वर्गाकडून केली जात आहे.

### यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचा ९५.३२% निकाल




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे फेब्रुवारी मार्च २०२५ परीक्षा इयत्ता बारावी वार्षिक निकाल जाहीर झाला करमाळा येथील विद्या विकास मंडळ संचालित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात इयत्ता बारावीचा ९५.३२% निकाल लागला आहे यामध्ये विज्ञान शाखेचा ९८.५२% वाणिज्य शाखेचा ९७.७७% तर कला शाखेचा ९२. १% निकाल लागला आहे विज्ञान शाखेमध्ये प्रथम तीन क्रमांक कोंडलकरकर भक्ती सतीश ७३.६७% प्रथम क्रमांक कोळेकर विक्रमदित्त बाळासाहेब ७३.१७% तृतीय क्रमांक वाणिज्य शाखेमधील प्रथम तीन क्रमांक वासाने मनसिंग हेतल ९०.६७% प्रथम क्रमांक सगळी अमृता नितीन ८७.१७ दुतीय क्रमांक चौगुले अनुष्का संतोष ८५.५० तृतीय क्रमांक कला शाखेचे प्रथम तीन क्रमांक मारडकर संजना अनिल ८८. प्रथम क्रमांक गोरे पूजा राजेंद्र ८६. ५०% द्वितीय क्रमांक शेख गुलनाज अबूबकर ८२.३३ टक्के तृतीय क्रमांक असे विज्ञान वाणिज्य कला शाखेतील प्रथम तीन क्रमांक आलेले आहेत.

या सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव विलासराव घुमरे सर संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड संस्थेचे सचिव विक्रम सिंह सूर्यवंशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एल बी पाटील कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाख व कनिष्ठ विभागाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि यांनी अभिनंदन केले.

### जागतिक मागणीनुसार रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करण्यासाठी कौशल्य विकास विभागाचे नवे पीपीपी धोरण

### महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) धोरणात्मक भागीदार असणार

# आयटीआयला जागतिक दर्जाच्या केंद्रात रूपांतरित करणाऱ्या धोरणाला शासनाची मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (आयटीआय) जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण संस्थांमध्ये रूपांतरित करून उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने कौशल्य, रोजगार आणि नाविन्यता विभागाने तयार केलेल्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी अर्थात पीपीपी धोरणाला आज राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या धोरणामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण, संस्थेतील पायाभूत सुविधा, जागतिक दर्जाच्या कंपन्यांमध्ये थेट उमेदवारी प्रशिक्षण आणि कंपन्यांच्या भागीदारीमुळे प्रशिक्षणार्थींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध होणार आहेत. सदर धोरणामार्फत काळानुरूप, नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम शिकवले जातील आणि २ लाख आयटीआय विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री श्री मंगल प्रभात लोढा यांनी मंत्रालयात वार्ताहर कक्षात पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. यावेळी अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा देखील उपस्थित होत्या.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) ह्या राज्याच्या व्यवसायिक शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग राहिल्या आहेत. या संस्थांना आता खऱ्या अर्थाने जागतिक औद्योगिक प्रशिक्षणाचे केंद्र बनवून महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी अर्थात पीपीपी धोरणाची गरज असल्याचे कौशल्य, रोजगार आणि नाविन्यता विभागाचे मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर स्पष्ट केले.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात आयटीआयने कुशल मनुष्यबळ पुरवून आतापर्यंत मोठे योगदान दिले आहे. मात्र आता जागतिक उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक प्रशिक्षित उमेदवारांची नितांत गरज भासू लागली आहे. अनेक संस्थांच्या पायाभूत सुविधांचा प्रश्न आहे. तसेच काही अभ्यासक्रमात त्रुटी आहेत. आर्थिक मर्यादा यासारख्या आव्हानांचा सामना या संस्थांना करावा लागत असून या संस्थांना पुनर्जीवित करून भविष्यातील गरजा ओळखून कुशल मनुष्यबळ तयार करणे आवश्यक आहे.

असे असेल पीपीपी धोरण

अग्रगण्य कॉर्पोरेट्स, औद्योगिक संघटना, परोपकारी व्यक्तींना अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी, अत्याधुनिक जागतिक प्रशिक्षण सुविधा प्रदान करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. तसेच उद्योगांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (उडठ) द्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सहभाग वाढवला जाईल.

१. १० वर्षे (किमान १० कोटी रुपये) आणि २० वर्षे (किमान २० कोटी रुपये )

२. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) धोरणात्मक भागीदार (स्ट्रॅटेजिक पार्टनर) म्हणून काम करणार आहे.

३. ग्रामीण भागात गरज पडल्यास निविदा काढून वायबिलिटी गॅप फंड (व्हीजीएफ) प्रणालीचा पर्याय म्हणून वापर करता येईल.

४. आयटीआयला त्यांचे स्थान, मूल्यांकन आणि संभाव्यतेच्या आधारे तीन याद्यांमध्ये विभागले जाईल.

५. आयटीआयच्या जागेची आणि इमारतीची मालकी सरकारकडे राहील.

६. आयटीआयबाबत सरकारची धोरणे कायम राहतील.

७. शिक्षक कर्मचाऱ्यांसह कर्मचारी कायम राहतील. तथापि, अतिरिक्त अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त कर्मचारी भागीदार उद्योगाद्वारे नियुक्त केले जाऊ शकतात.

८. नवीन भागीदारांना उपकरणे, साहित्य खरेदी आणि नूतनीकरण / बांधकामास परवानगी दिली जाईल. सरकारी निविदा प्रक्रियेचे पालन न करता खुल्या बाजारातून ते हे करू शकतात.

९. प्रत्येक आयटीआयमध्ये एक पर्यवेक्षण समिती (आयएमसी) असेल जिथे नवीन येणारा भागीदार अध्यक्ष असेल तर सचिव आयटीआयचे प्राचार्य / उपप्राचार्य किंवा सरकारने नियुक्त केलेली व्यक्ती असेल.

१०. यासंदर्भात कोणताही वाद मिटविण्यासाठी राज्यस्तरीय संचालन समिती असेल.

११. आयटीआयमध्ये भागीदार उद्योगाकडून शिक्षण किंवा रोजगार संबंधित कार्यक्रम वगळता इतर कोणत्याही क्रियाकलापांना परवानगी दिली जाणार नाही.

* उद्योग कॉर्पोरेट यांच्या सामाजिक जबाबदारी (उडठ) अंतर्गत कर सूट, यासारख्या शासकीय प्रोत्साहनाची बदल्यात उपकरणे, पायाभूत सुविधा, बांधकाम, प्रशिक्षक आणि निदेशक यांचे प्रशिक्षण इत्यादीमध्ये गुंतवणूक करू शकतील.

१२. उद्योगासह गुंतवणुकीद्वारे इमारत दुरुस्ती, अत्याधुनिक प्रयोगशाळा, स्मार्ट वर्ग खोल्या आणि डिजिटल शिक्षण सुविधा उभारण्यात येतील. पहिल्या टप्प्यात राज्यातील किमान २५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था निवडण्यात येतील, त्यानंतर प्रायोगिक उपक्रमांचा आढावा घेऊन १०० प्रशिक्षण संस्था पीपीपी धोरणात समाविष्ट केल्या जातील.

१३. औ.प्र.संस्था उद्योग भागीदारांसह संयुक्त प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रम राबवतील. हे अभ्यासक्रम राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषद (छउतएढ), महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (चडइडतएढ) व रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्याशी संलग्न असतील. अभ्यासक्रमात प्रशिक्षण नोंदणीकृत प्रशिक्षणार्थी आणि बाह्य उमेदवारांनाही प्रशिक्षण देण्यात येईल. शासनातील अंतर्गत नियमानुसार प्रशिक्षणार्थींना प्रतिपूर्ती देण्यात येईल. तर बाह्य उमेदवारांना हे प्रशिक्षण शुल्क भरावे लागेल.

बदलते अभ्यासक्रम

१. पीपीपी धोरणामुळे विद्यार्थ्यांना जागतिक औद्योगिक प्रशिक्षणाची संधी

२. ख, सायबर सुरक्षा, ए लर्निंग प्लॅटफॉर्म, ऑडीटिव्ह मॅनुफॅक्चरिंग, आय ओ टी आणि रोबोटिक्स आणि हरित ऊर्जा सारख्या जागतिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेता येईल.

३. विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात प्रभावी असलेल्या उद्योग समूहांचा समावेश असल्याने सेंटर ऑफ एक्सलन्स संकल्पना राबवण्यात येईल. पुणे आणि छत्रपती संभाजी नगरमध्ये ऑटोमोबाईल कंपन्या अधिक असल्याने तिथे सेंटर ऑफ एक्सलन्स सेंटर विकसित केले जाऊ शकते. त्यामुळे तिथल्या प्रकल्पांच्या गरजेनुसार प्रशिक्षणार्थींना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

४. प्रात्यक्षिक ज्ञानावर अधिक भर, उद्योगांच्या अनुषंगाने आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार होण्यास मदत

प्रशिक्षणार्थींना स्टार्ट अप्ससाठी मार्गदर्शन, कार्यक्षेत्र आणि निधी सहाय्य प्रदान करणारे कॅम्पस आणि विविध रोजगार मेळाव्यांचे आयोजन त्यात थेट कंपन्यांचा सहभाग

५. महिलांचा सहभाग वाढवण्यावर भर, कंपन्यांकडून महिलांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातील.

६. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खपर्वीीीू रश्रळसपशव) उद्योग सरेखित मॉडेल अन्वये कार्यरत राहील आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मनुष्यबळ पुरवण्यास अधिक सामर्थ्यशील होईल.

७. प्रशिक्षणार्थींना रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी पीपीपी तत्वावर चालवण्यात येत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतच जॉब प्लेसमेंट सेल स्थापन करण्यात येईल.

सार्वजनिक –खाजगी भागीदारीवर (झझझ) शासनाचे संपूर्ण नियंत्रण

१. प्रत्येक भागीदारी केलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेवर व्यवस्थापन समितीचे लक्ष राहील

२. उद्योग भागीदारांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला प्रदान केलेली उपकरणे आणि सेवांवर त्यांचा कोणताही मालकी हक्क राहणार नाही. यावर शासनाचा हक्क राहील.

३. खाजगी उद्योग संथानी निर्माण केलेल्या पायाभूत सुविधा शासनाच्याच अधीन असतील. त्याठिकाणी उद्योग संस्था खाजगी कार्यालय स्थापित करू शकत नाहीत.

४. उद्योग भागीदारीचा परिणाम म्हणून संबंधित संस्थेचे नाव बदलले जाऊ शकत नाही. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या परवानगीने परिसरातील काही ठिकाणी उद्योगाचे नाव प्रदर्शित करण्याची परवानगी देण्यात येईल.

५. उद्योग भांडवली खर्च (उझएद) आणि परिचालन खर्च (जझएद) दोन्हीमध्ये उद्योग समूहांचा खर्च

६. राज्य सुकाणू समिती उद्योग भागीदारांना प्रशिक्षण संस्थेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींचे निराकरण करेल.

७. भागीदाराने कोणत्याही वेळी शासकीय अधिनियम, नियम तसेच करारात नमूद अटी व शर्तींचा भंग केल्यास त्यांच्या कामगिरी समाधानकारक नसल्यास, त्यांचे कार्य शासकीय प्रशिक्षण संस्थेच्या हिताच्या विरुद्ध आढळून आल्यास करार रद्द करण्याबाबत राज्य सुकाणू समिती निर्णय घेईल.

महाराष्ट्रातील सार्वजनिक-खाजगी (पीपीपी) भागीदारी धोरणाद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची उन्नती करणे. उद्योगाच्या मागणीनुसार सुसंगत कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी भागीदारी धोरण हे एक ऐतिहासिक पाऊल आहे. या धोरणामुळे महाराष्ट्रात जागतिक दर्जाचे कौशल्य केंद्र स्थापन करण्याचे उद्दिष्ट दृष्टीपथात आहे. त्याचबरोबर रोजगारक्षमता वाढवण्यासोबतच राज्याच्या आर्थिक वृद्धीस देखील यामुळे योगदान मिळणार असून, सहयोगाने हे आदर्श उदाहरण ठरणार आहे. पीपीपी तत्वावर महाराष्ट्रात प्रगत औद्योगिक केंद्रांची उभारणी झाल्यास कुशल मनुष्यबळाचे महाराष्ट्र हे जागतिक स्तरावरील आदर्श मॉडेल म्हणून नावारूपाला येऊ शकेल.

# त्रिसरण पंचशील ग्रहण करुन सासवड येथे बुध्द जयंतीनिमित्त तथागथाला वंदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/ डॉ विनायक गायकवाड : जगाला विश्वशांतीचा संदेश देणा-या तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५८७ व्या जयंती निमित्त , सासवड येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे त्रिसरण पंचशील ग्रहण करुन तथागत भगवान गौतम बुद्ध यांना विनम्रपणे वंदन करण्यात आले,



कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे निर्माते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला, त्यानंतर सामूहिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले .

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिलतात्या धिवार, जेष्ठ नेते आनंदराव घोरपडे सासवड नगरपरिषद आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे पुरंदर तालुक्याचे अध्यक्ष कालीदास उबाळे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे जिल्हा कार्याध्यक्ष नामदेव नेटके, बहुजन सामाजिक विकास प्रतिष्ठानचे सचिव डॉ विनायक गायकवाड, कार्याध्यक्ष सुहास वाघमारे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे तालुका कार्याध्यक्ष सुधीर शेलार, रिपब्लिकन पक्षाचे तालुका उपाध्यक्ष सचिन कांबळे, सामाजिक कार्यकर्ते सुनिल अर्जुन जगताप, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामकृष्ण वाघमारे सर, जेष्ठ नेते आलरख खरात, परीवर्तन महासभेचे नेते मनोज भिसे, निखिल आढाळगे ,राजेश आढाळगे, किशोर आढाळगे, विजय शेंडगे, सागर पाटोळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

# वडपे येथील गोदामांना भीषण आग; २२ गोदाम जळुन खाक

## कोणतीही जीवितहानी नाही; ९ तासांनी मिळवले आगीवर नियंत्रण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुंबई नाशिक महामार्गावरील वडपे गावच्या हद्दीतील रिचलँड कॉम्प्लेक्स या गोदाम संकुलास सोमवारी पहाटे भीषण आग लागली. या गोदाम संकुलातील २२ गोदाम आगीच्या भक्षस्थानी पडले असून या गोदामात कपडे, बूट, केमिकल, इलेक्ट्रॉनिकस साहित्य मोठ्या प्रमाणावर साठवले होते.

या आगीत गोदामात साठवलेला कोट्यावधी रुपयांचा माल जळून खाक झाला आहे.आगीची माहिती मिळताच भिवंडीसह कल्याण येथील प्रत्येकी दोन अशा चार अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविण्याचे कसोशीने प्रयत्न सुरू केले. परंतु पाण्याची कमतरता असल्याने आग विझवण्यात अग्निशामक दलास अडचण येत होती. गोदामात केमिकल ठेवला असल्याने केमिकल गोदामातील आग विझवण्यासाठी फोमचा वापर करण्यात आला.आगीचे कारण अजून अस्पष्ट असून, मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

रिचलँड कॉम्प्लेक्स या गोदाम संकुलात के के इंडिया पेट्रोलियम स्पेसियालिटीज प्रा.ली., कॅनन इंडिया प्रा.ली.कंपनी, ब्राईट लाईफकेअर प्रा.ली. कंपनी, होलीसोल प्रा.ली.कंपनी, एबॉट हेल्थकेअर प्रा.ली.कंपनी, डेकोरेशन साहित्याचे मोठे गोदाम होते.

या गोदामात मोठ्या प्रमाणात केमिकल, प्रिंटिंग मशीन, इलेक्ट्रॉनिक साहित्य, प्रोटीन खाद्यपदार्थ पावडर, कॉस्मेटिक साहित्य, कपडे, बूट, मंडप डेकोरेशन साहित्य व फर्निचर साठवण्यात आले होते. तब्बल नऊ तासांनी या आगीवर अग्निशामक दलाच्या जवानांनी नियंत्रण मिळविले.



# भाजपाचा अनुसूचित जाती मोर्चा पुणे जिल्हा सरचिटणीस पदी नागेश गायकवाड यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर तालुका प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे : भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र अनुसूचित जाती मोर्चा पुणे जिल्हा सरचिटणीस पदी नागेश (भाऊ) गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. त्यांची निवड अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्राचे सरचिटणीस सचिन आरडे व पुणे जिल्हाध्यक्ष अनुसूचित जाती मोर्चा मयूर कांबळे यांनी केली आहे. नागेश गायकवाड यांना इंदापूर येथील एका कार्यक्रमातच माननीय आमदार गोपीचंदजी पडळकर व अनुसूचित जाती मोर्चाचे महाराष्ट्र सरचिटणीस सचिनजी आरडे व असंख्य कार्यकर्त्यांसमक्ष नियुक्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

नियुक्तीपत्र देताना सचिन आरडे म्हणाले की, नागेश (भाऊ) गायकवाड यांचे सामाजिक कार्य पाहूनच त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी आत्तापर्यंत शासकीय व खाजगी रुग्णालयात गोरगरीब लोकांना मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. तसेच सर्व हिंदू-मुस्लिमांच्या सर्व सण उत्सवामध्ये हिरीरेने भाग घेऊन त्यांना पाहिजे ते सहकार्य करत असतात व महापुरुषांच्या जयंती पारंपारिक पद्धतीने मोठ्या प्रमाणात स्वतः साजऱ्या करतात. त्यांचे संघटन कौशल्य चांगले असल्यामुळे व युवकांची चांगला फौजफाटा त्यांच्या पाठीशी असल्यामुळे त्यांची पुणे जिल्हा सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

नागेश गायकवाड यांनी आत्तापर्यंत वाढदिवसाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करत असतात, अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप करणे, मूकबधिर व आश्रम शाळेत जाऊन खाऊ वाटप करणे, शासकीय व खाजगी दवाखान्यात जाऊन गोरगरिबांना फळांचे वाटप करणे, कोणत्याही कार्यकर्त्याला कुठल्याही प्रकारची अडचण आली तरी ते निम्म्या रात्री सुद्धा धावून जाऊन त्याची अडचण दूर करतात.

नागेश गायकवाड यांनी अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविले उदाहरणार्थ युवकांचे चांगली फळी इंदापूर तालुक्यात उभा केली. त्यांच्यासोबत असलेल्या युवकांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात कामे केली. यामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे व आरोग्य शिबिरे अशी वेगवेगळे कार्यक्रम घेऊन गोरगरिबांना कशी मदत होईल याची नेहमीच ते काळजी घेत असत. त्यांच्या याच कामाची दखल घेऊन त्यांना आता अनुसूचित जाती मोर्चा पुणे जिल्हा सरचिटणीस पदी नेमणूक केली आहे.



यावेळी नागेश गायकवाड दैनिक जनप्रवास प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले, यापुढे इंदापूर तालुक्यात व पुणे जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचे संघटन वाढीसाठी सदैव प्रयत्न करणार आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली विकास कामे, केंद्र व राज्य सरकारच्या योजना तालुक्यातील गोरगरीब जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही सर्व एकत्रित काम करू. तसेच आत्ताच केंद्र सरकारने उसाच्या एफ आर पी मध्ये १५० रुपयाची वाढ केल्यामुळे नागेश गायकवाड यांनी केंद्र सरकारचे अभिनंदन केले आहे. केंद्र सरकारने या केलेल्या एफ आर पी वाढीचा माझ्या इंदापूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तसेच पुणे जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांना फायदाच होऊन ऊस उत्पादकांना चांगले दिवस येतील व उसाचे क्षेत्र ही वाढण्यास मदत होईल.

# नांदुर्डी जनता विद्यालयाचा चा निकाल ९८. ०२ टक्के

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाजाचे जनता विद्यालय नांदुर्डी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या डडउ परीक्षेचा इयत्ता १०वी फेब्रुवारी २०२५ चा निकाल जाहीर झाला असून विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.०२% लागला असून परीक्षेला एकूण प्रविष्ट विद्यार्थी - १५२, पास विद्यार्थी - १४९, नापास विद्यार्थी - ०३.

फेब्रुवारी २०२५ परीक्षेत विद्यालयातील पहिले पाच विद्यार्थी

१) शिंदे शिवम ज्ञानेश्वर ९१.८० २) आहेर सानिका सुनिल ८८.८० २) जाधव समर्थ संदिप ८८.८० २) आहेर कावेरी सोमनाथ ८८.८० ३) आहे तेजस्वीनी संतोष ८८.४० ४) काशिद दर्शन प्रकाश ८७.६० ५) देसाई श्रृती अमोल ८७.२०

गुणवंत विद्यार्थ्यांचे सरचिटणीस ॲड. नितीनभाऊ ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, मविप्र उपाध्यक्ष विश्वास मोरे साहेब संचालक. शिवाजी गडाख, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ ढोके सर, शालेय समिती तीनही कमिटीतील अध्यक्ष सर्व पंचक्रोशीतील सदस्य, मुख्याध्यापक म्हसकर बी. डी. ,पर्यवेक्षिका श्रीम.रणशुर मॅडम तसेच सर्व इ.१० वी ला मार्गदर्शन करणारे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.




# बुद्धाच्या तत्त्वज्ञानाने एक तृतीयांश जग प्रभावित : डॉ. शरद गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : तथागत गौतम बुद्धाच्या तत्त्वज्ञानाने एक तृतीयांश जग प्रभावित असल्याचे प्रतिपादन कोल्हापूर येथील जेष्ठ विचारवंत प्रा.डॉ. शरद गायकवाड यांनी व्यक्त केले.

ते येथील शैक्षणिक क्रांती मंच यांच्या वतीने बुद्ध पौर्णिमेनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजित करण्यात आलेल्या समाज प्रबोधनपर विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्रीपूर येथील कर्मयोगी सु.रा. परिचारक सह. साखर कारखान्याचे संचालक श्री. किसनराव सरवदे (सर) होते.

तसेच यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर येथील प्रसार माध्यमे व सामाजिक चळवळीचे अभ्यासक प्रा.डॉ. बापू चंदनशिवे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

यावेळी डॉ. गायकवाड म्हणाले की, बुद्धतत्त्वज्ञानाने संपूर्ण जगाला गेली अडीच हजार वर्षांपासून प्रभावित केलेल् असून विवेकवादी, विज्ञानवादी आणि मानवतावादी विचारांची रुजवणूक बीजारोपण करून जगाला न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची शिकवण बुद्धांनी आपल्या कृती युक्तीतून दिली.

भारत ही बुद्धाची जन्मभूमी अशी जगाला भारताची ओळख आहे. सिद्धार्थ गौतम बुद्ध हे मोक्षदाता नवे तर मार्गदाता आहेत. संपूर्ण भारत देश बुद्धतत्त्वज्ञानाने दीड हजार वर्षे बौद्ध पद्धतीने जगत आलेला होता परंतु मनुवादी मानसिकतेमुळे इथला धम्म येथे पराभूत झाला आणि संपूर्ण जगाने तो स्वीकारला आणि अंगीकारला म्हणून जग विकसित झाले. असे डॉ. गायकवाड म्हणाले.

प्रा. डॉ. बापू चंदनशिवे म्हणाले,बुद्ध हा सामाजिक व धार्मिक क्रांतीचा प्रवर्तक असून त्याने आयुष्यभर माणसाला केंद्रीभूत मानून काम केले. मनुवादाच्या विरोधात सम्यक क्रांती करीत प्रत्येकाला प्रबुद्ध होण्यासाठी आवश्यक ज्ञान मानवाला दिले. बुद्धाच्या ज्ञानाची जोड देऊन जीवन जगणे म्हणजे संबुद्ध होऊन जगणे आहे. बुद्ध प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पद्धतीचे युद्ध नाकारतो. तो कोणत्याही संघर्षावर संवादाने मार्ग निघू शकतो यावर विश्वास ठेवतो. जगाने बुद्धाच्या विचारावर मार्गक्रमण केल्यास कधीही युद्ध आणि संघर्ष उद्भवण्याची शक्यता नाहीच. प्रबुद्ध होणे हे जरी कठिण काम असले तरी त्याच्याशिवाय पर्याय नाही.

यावेळी प्रास्ताविक व स्वागत प्रा. डॉ. धनंजय साठे यांनी केले. सूत्रसंचालन दत्तात्रय कांबळे (सर) केले. आभार श्री.राजेंद्र कांबळे (सर) यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय शिक्षण विस्तार अधिकारी डॉ.बिभीषण रणदिवे यांनी करुन दिला.

या वेळी माजी नगरसेवक सुनील सर्वगोड, बाळासाहेब कसबे, एस के आयवळे (सर), युवराज पवार, सुनील वाघमारे, श्रीकांत कसबे, जितेंद्र बनसोडे, एल. एस. सोनकांबळे, डी राज, सर्वगोड, भालचंद्र कांबळे, माजी नगरसेवक उमेश पवार, गणेश खंदारे साहेब, प्रकाश भिंगारे साहेब, सचिन भंडारे (सर), जगधने सर, बा. ना.धांडोरे (सर), प्राचार्य, भारत खिलारे, प्राचार्य, महादेव लवटे, लेखक भास्कर बंगाळे, नितीन काळे, शंकर माने (सर), प्राचार्य तानाजी साळुंखे, एड.बादल यादव, एड. किशोर खिलारे, अजित खिलारे, अमित अवघडे, अमोल वाघमारे, निवास सातपुरे (सर) उपस्थित होते.

### संतप्त नागरिकांचे मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार

### नागरिकांचे आरोग्य धोक्यात

# दुधनी नागोबा नगरात अस्वच्छतेचे साम्राज्य; सांडपाण्याच्या समस्येकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/ निगप्पा निबाळ : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी शहरातील नागोबा नगर भागात सध्या मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पसरली आहे. गटारी तुंबल्या असून सांडपाण्याचे पाणी रस्त्यावर साचले आहे. ड्रेनेज आणि पाणीपुरवठ्यासाठी खोदलेल्या खड्ड्यांतील दगडमातीमुळे गटारी कोसळल्या आहेत, ज्यामुळे सांडपाणी मोठ्या प्रमाणात साचले आहे. या घाणीमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डास आणि जंतूंचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या गंभीर समस्येकडे दुधनी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे नागोबा नगर आणि वढार वस्तीतील संतप्त नागरिकांनी आता मुख्याधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापनाची मागणी करणारे निवेदन नागरिकांनी दुधनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मीकांत कहार यांना सादर केले आहे.

या निवेदनात नागरिकांनी सांगितले आहे की, साचलेल्या सांडपाण्यामुळे रस्ते चिखलमय झाले आहेत आणि नागरिकांना, महिलांना व वृद्धांना ये-जा करण्यास प्रचंड त्रास होत आहे. वारंवार तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असेही त्यांनी नमूद केले आहे.

निवेदन सादर करतेवेळी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर मानकर, लक्ष्मीपुत्र मानकर, अमरीष मानकर, मंजूनाथ मानकर, सातलिग मानकर, बसवराज माळी, भागेश गुळगोंड, लक्ष्मीपुत्र, रवि मानकर, सिध्दु कळसे यांच्यासह अनेक नागरिकांच्या सह्या आहेत.

यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी यांनी याबाबत बोलताना सांगितले की, दुधनीच्या



मुख्याधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून या अस्वच्छतेची समस्या तातडीने दूर करावी. अन्यथा, प्रभागातील महिला व नागरिकांच्या वतीने मुख्याधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नावावर बोंबा बोंब आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# भाजपच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी चेतन सिंह केदार सावंत यांची फेरनिवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जिल्हाध्यक्ष पदाच्या कार्यकाळात भारतीय जनता पार्टी संघटन पर्व अभियानांतर्गत भारतीय जनता पक्षाचे सदस्य नोंदीत राज्यात प्रथम क्रमांकाची नोंदणी करत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल टकल घेत परत सोलापूर जिल्ह्यात अध्यक्षपदी चेतन सिंह केदार यांची फेर निवड झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी फटाक्याची आताच बाजी करून करून जल्लोष साजरा केला.

जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीची पकड घट्ट करण्यासाठी भाजप प्रदेश कार्यकारणीच्या आदेशान्वये सदस्य नोंदणी जोरदार मोहीम हाती घेतली होती व या अभियानात भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हा भाजप सदस्य नोंदणीत महाराष्ट्रात अवघड ठरला आहे याची पोचपावती म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकारिणीच्या स्वाक्षिणे भाजपचे सोलापूर ग्रामीण पश्चिम चे जिल्हाध्यक्ष चेतनशील केदार सावंत यांचा सन्मान करून शाबासकी दिली.



आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सदस्य नोंदणी उद्दिष्ट दिले होते जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंतच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील भाजपच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी दिवस-रात्र मेहनत करून सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील तालुकाप्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते शक्ति केंद्रप्रमुख बुथ प्रमुख यांनी भाजप सदस्य मोहिमेत राज्यात अव्वल क्रमांक पटकावला आहे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाचे शेतता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे कार्यकारी अध्यक्ष तथा संघटन पर्व प्रभारी रवींद्र चव्हाण उच्च चंद्रकांत पाटील सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे माजी खासदार रणजीत सिंह निंबाळकर आमदार चित्राताई वाघ देश महामंत्री राजेश पांडे पश्चिम महाराष्ट्र मंत्री मकरंद देशपांडे आमदार सचिन कल्याण सिटी माजी आमदार राजाभाऊ राऊत माजी आमदार प्रशांत परिचारक माजी आमदार राम सातपुते यांच्या सर्वांच्या मदतीने सदस्य नोंदणी करण्यात आली आहे.